# शिवशौर्य ट्रेकर्स (रजि.)

(नोंदणी क्र. :- महाराष्ट्र/मुंबई १३२५/२०१३/जी.बी.बी.एस.डी.)

आयोजित

# पन्हाळगड, पावनखिंड ते विशाळगड ऐतिहासिक पदभ्रमण मोहिम

## गुरुवार दि. १० जुलै ते रविवार दि. १३ जुलै २०१४



पन्हाळगड ते विशाळगडाचा इतिहास २१ तासांच्या जीवघेण्या पाठलागाचा आहे, असीम त्यागाचा आहे, पराकोटीच्या स्वामी निष्ठेचा आणि नि:स्वार्थी बलिदानाचा आहे! जगाच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिल्या गेलेल्या थरारक महानाट्याचा अनुभव घेण्यासाठी, ज्यांच्यामुळे आपलं आराध्य दैवत शिवाजीमहाराज सुखरुप राहीले, ज्यांनी आपलं स्वराज्य टिकवलं त्या नरवीर शिवा काशिद, बाजीप्रभू आणि त्यांच्या बांदलवीरांना अभिवादन करण्यासाठी....**शिवशौर्य ट्रेकर्स 'पन्हाळगड, पावनखिंड ते विशाळगड ऐतिहासिक पदभ्रमण मोहिम' दरवर्षी आयोजित करीत असते. येत्या १० जुलै २०१४ रोजी आपण या ऐतिहासिक मोहिमेत सहभागी व्हा.**

**आपल्या सोबत आहेत इतिहास अभ्यासक श्री. श्रीदत्त राऊत**

संस्था सामाजिक जबाबदारीचं भान ठेऊन मुक्कामाच्या गावातील मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी शैक्षणिक साहित्याचं वाटप करत असते. सहभागी सदस्यांनाही इच्छा असल्यास एखादे गोष्टीचे पुस्तक, एखादे खेळाचे साहित्य किंवा तत्सम स्वरुपात मदत करु शकतात.

**।। पावनखिंडीतील रणसंग्रामाला अभिवादन ।।**

नरवीर बाजीप्रभू देशपांडे - ३५४ वी पुण्यतिथी

आषाढ वद्य प्रतिपदा, शिवशक ३४१, रविवार दि. १३ जुलै २०१४

## कार्यक्रमाची रुपरेषा

### गुरुवार दि. १० जुलै (दिवस १ला)

**सकाळी ६ वा.** पन्हाळगडावर आगमन, पन्हाळगड, पावनगड दर्शन

**सायं.७ वा.** मोहिमेबाबत तसेच इतिहास मार्गदर्शन

### शुक्रवार दि. ११ जुलै (दिवस २रा)

**सकाळी ९ वा.** वीर शिवा काशिद यांच्या समाधीला व बाजीप्रभूंच्या पुतळ्याला वंदन करुन पदभ्रमण मोहिमेची सुरुवात

**दुपारी ३ वा.** खोतवाडी गावात आगमन आणि मुक्काम

### शनिवार दि. १२ जुलै (दिवस ३रा)

**सकाळी ७.०० वा.** पदभ्रमण मोहिमेला सुरुवात

**सायं ५ वा.** म्हाळसवडे गावात आगमन आणि मुक्काम

### रविवार दि. १३ जुलै (दिवस ४था)

**सकाळी ६.०० वा.** पदभ्रमण मोहिमेला सुरुवात

पावनखिंडीत बाजीप्रभू व धारातीर्थी पडलेल्या सर्व वीरांना अभिवादन

**दुपारी ३.०० वा.** विशाळगडावर आगमन आणि मोहिमेची सांगता

प्रशस्तीपत्र वाटप आणि परतीचा प्रवास



पन्हाळगड



म्हसाई पठार



पावनखिंडीच्या दिशेने



कासारी नदी

## फक्त मोहिमेचा खर्च रु. ११५०/-

**(चहा, नाष्ता, जेवण, राहणे खर्च अंतर्भूत)**

- २ जुलै पर्यंतच नांव नोंदणी सुरु राहील.
  तसेच २ जुलै पर्यंतच केलेली नांव नोंदणी रद्द करता येईल व भरलेले शुल्क पूर्ण परत मिळेल. **(जागा मर्यादीत, प्रथम येणाऱ्यास प्राधान्य)**
- २ जुलै नंतर नांव नोंदणीसाठी जादा रु. २००/- शुल्क आकारले जाईल तसेच केलेली नांव नोंदणी रद्द करता येणार नाही.
- **पन्हाळागडापर्यंत येण्याची व्यवस्था तसेच विशाळगडाहून परतीच्या प्रवासाची सोय आयोजकांशी चर्चा करुन ठरवता येईल.**
- आजीव सदस्यांना मोहिम शुल्कात रु. १००/- सवलत असेल

## आवश्यक असलेले साहित्य :

- ★ **दोन्ही खांदयावर घेता येईल अशी १ मोठी आणि १ छोटी सॅक. सामान कमीत कमी आणावे.**
- ★ चांगल्या प्रतीचे ट्रेकिंगचे **बुट**, मोजे, स्लीपर, रेनकोट/छत्री, **जरुरी पुरतेच कपडे**,
- ★ जेवणासाठी ताट, वाटी, पेला, चमचा, पाण्याची १ लीटर बाटली, **टिफीन बॉक्स (रोजचा पॅकलंच घेण्यासाठी)**
- ★ अंथरुण, पांघरुण, स्वतःच्या आकाराची **प्लॅस्टीक शीट**, टॉर्च, कॅमेरा,
- ★ व्यक्तिगत औषधे जवळ बाळगावीत. तसेच Zole-F (ओल्या कपड्यांपासून त्वचा काचते) हे औषध आवश्यक.
- ★ **सर्व कपडे छोट्या, छोट्या प्लॅस्टीक पिशव्यांमध्ये ठेवून त्यासर्व पिशव्या मोठ्या प्लॅस्टिकच्या पिशवीत ठेवाव्यात. (पावसात सॅक भिजली तरी कपडे सुके राहतील)**
- ★ **स्टॅम्प साईज १ फोटो**

## महत्वाच्या सूचना :

(१) शिवशौर्य ट्रेकर्स सर्वच गड किल्यांचे पावित्र्य राखण्याचा प्रयत्न करते त्यामुळे सदर मोहिमेत कुठल्याही प्रकारचे व्यसन करु दिले जाणार नाही. (२) वरील 'आवश्यक असलेले साहित्य' आणावेच लागेल अन्यथा तुमची गैरसोय होऊ शकेल. (३) मोहिमप्रमुखाने दिलेल्या सूचनांचे तंतोतंत पालन करणे आवश्यक आहे. (४)सदर कार्यक्रमात प्रसंगानुरुप काही बदल करावयाचे झाल्यास त्याचा अधिकार फक्त मोहिमप्रमुखाला राहील. (५)सदर मोहिमेत आपतकालीन काही परिस्थीती उद्भवल्यास किंवा सहभागी सदस्यास काही दुखापत झाल्यास शिवशौर्य ट्रेकर्स संस्था जबाबदार असणार नाही, याची सदस्यांनी नोंद घ्यावी.

**पन्हाळगड, पावनखिंड ते विशाळगड मोहिम ही सहल, पिकनिक किंवा मजेसाठी काढण्यात आलेली यात्रा नसून अत्यंत उदात्त भावनेतून एका महान ऐतिहासिक प्रसंगाला वंदन करण्यासाठी आपण हे पदभ्रमण करतोय. इतर यात्रा कंपन्यांच्या सहली आणि सदर मोहिमेच्या आयोजनाची तुलना करु नये, हा कार्यक्रम आपल्या सर्वांचा आहे. हा कार्यक्रम सर्वांनी मिळून यशस्वी करुया.**

***- मोहिमप्रमुख योगेश शिरसाट***

**संपर्क :** मुंबई- अमित-9320 755 539, गुरुनाथ 9869084912 नाशिक - योगेश शिरसाट 9970626269,
पुणे - ऋतुराज 9767 973 419, नागपूर - मोहन बेडेकर 9423686422
Email : shivashourya.trekkers@gmail.com Facebook : Shivashourya Trekkers

पुढील संमतीपत्रक संपूर्ण भरणे आवश्यक आहे. संमतीपत्रक प्रत्यक्ष किंवा ई-मेल द्वारे स्विकारले जाईल.

**शुल्क प्राप्त झाल्याचे एस एम एस आपल्याला मोबाईलवर पाठवले जाईल.**

### मोहिमसदस्यांचे संमतीपत्रक

मी /माझा पाल्य ____________________

जन्म दिनांक :__________ रक्तगट :________ ईमेल : ____________________

स्वतःचा संपर्क क्र.:____________________ घरातील एकाचा संपर्क क्र. ____________________

पत्ता : ____________________

**'पन्हाळगड, पावनखिंड ते विशाळगड पदभ्रमण मोहिम २०१४'चे शुल्क रु. रोख किंवा बॅकेत भरत असून आपण वर नमुद केलेल्या सर्व पाचही सुचना मला मान्य आहेत मी स्वखुषीने या मोहिमेत सहभागी होत आहे / माझ्या पाल्यास सहभागी करीत आहे.**

**सहभागी सदस्याची / पालकाची सही**

Bank of Maharashtra, Branch- Prabhadevi, Account No.- 60134804616, IFSC Code-MAHB0000318, MICR Code-400014022, या खात्यात SHIVASHOURYA TREKKERS या नावाने रक्कम भरावी.

रक्कम भरल्यावर त्वरीत 9320755539 क्रमांकावर फोन करुन कळवावे.